| | |
|---|---|
| **MHLA130000252026** | दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०८/२०२६<br>रामराव व इतर वि. निरंक |

<u>**निशाणी क्र.१ वरील आदेश**</u>

**०१.** प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ कलम २ मधील तदतुदींप्रमाणे 'वारस प्रमाणपत्र' (Heirship Certificate) मिळण्याची मागणी केलेली आहे.

**०२.** अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, मयत भागवत बाळा पुंडकरे हे अर्जदार व इतर वारस क्र.२ व ३ यांचे वडील असून इतर वारस क्र.१ यांचे पती आहेत. अर्जदाराव्यतिरीक्त मयत भागवत बाळा पुंडकरे यांना अन्य कोणीही वारस नाहीत. मयत भागवत बाळा पुंडकरे हे दि.०२.०८.२०२५ रोजी मौजे कुंभारवाडी, ता.रेणापूर, जि.लातूर येथे मयत झाले. मयत भागवत बाळा पुंडकरे यांचे शासकीय कार्यालयात अर्जदार यांचे नावाची वारस नोंद लावण्यासाठी गेले असता त्यांना वारस प्रमाणपत्र आणण्याविषयी सांगितले. सबब, अर्जदार हे मयत भागवत बाळा पुंडकरे यांचे कायदेशीर वारस असल्याने वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता विनंती केली आहे.

**०३.** अर्जदारांनी केलेल्या मागणीविरुध्द कोणास काही हरकत असल्यास ती नोंदविण्यासाठी दि.१८.०१.२०२६ रोजी जाहिरनामा दैनिक ' विश्वउदय' मध्ये जाहीर प्रगटन नि.११ अन्वये प्रसिध्द करण्यात आले. नि.८ कडील जाहिरनाम्याचा अहवाल पाहता दि.१९.०१.२०२६ रोजी सदरचा जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आलेला आहे. परंतु अर्जदारांच्या मागणीविरुध्द कोणीही हरकत नोंदविलेली नाही अथवा

न्यायालयासमक्ष हजर होऊन वारसा प्रमाणपत्राची मागणी केली नाही.

**०४.** अर्जदारांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ अर्जदार रामराव यांचे सरतपासणीचे शपथपत्र नि.१२ वर दाखल केले आहे. तसेच अर्जदारांनी या प्रकरणात नि.१३ वर मयताचे मृत्यु प्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्डच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत.

**०५.** अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदाराच्या मागणीविरुध्द कोणीही हरकत अथवा आक्षेप न नोंदविल्यामुळे अर्जदार हे मयत भागवत बाळा पुंडकरे यांचे वारस असल्याचे निर्विवादपणे स्पष्ट होते. अर्जदाराचे कथन निर्विवाद राहील्याने अर्जदारांच्या कथनावर विश्वास न ठेवण्यासारखे काहीही दिसून आले नाही. त्यामुळे अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी पुढील आदेश पारित करीत आहेः–

**आदेश**

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** अर्जदार रामराव भागवत पुंडकरे, इतर वारस क्र. १ गयाबाई भागवत पुंडकरे, क्र.२ किरणकुमार भागवतराव पुंडकरे, क्र.३ ललिता गोरख पाटील हे मयत भागवत बाळा पुंडकर रा. कुंभारवाडी, ता.रेणापूर जि.लातूर यांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) योग्य त्या न्यायालयीन शुल्क मुद्रांकावर देण्यात यावे.

Digitally signed by POOJA ANAND APTE
Date: 2026.07.06 16:17:09 +0530

**(पी.ए.आपटे)**

**दि.०६.०७.२०२६.** **दिवाणी न्यायाधी, क.स्तर,रेणापूर**